


दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २०८ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.४ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# कापणी झालेल्या पिकांच्या नुकसानीसाठी मिळणार भरपाई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

## पडझडीच्या प्रकरणात तातडीने मदतीच्या सूचना



**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यातील विविध भागात नुकत्याच झालेल्या पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अशा प्रकारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत विचार केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.राज्य मंत्रिमंडळाची सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे आज बैठक झाली. या बैठकीच्या सुरवातीला राज्यात झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला गेला. त्यावेळी विविध मंत्र्यांनी कापणी केलेल्या पिकांचे नुकसान झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वरील प्रमाणे सांगितले.मदत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाव्दारे राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आणि मदतीची सादरीकरणाव्दारे माहिती दिली.

त्यांनी सांगितले की, राज्य मंत्रिमंडळाच्या २७ मे रोजी झालेल्या बैठकीत घरांच्या पडझडींच्या दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करीता तातडीने मदतीकरीता निधी द्यावा अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. कोकण विभागास पाच कोटी, पुणे विभागास १२ कोटी, नाशिक विभागास पाच कोटी, छत्रपती संभाजी नगर विभागास १२ कोटी, अमरावती विभागास पाच कोटी आणि नागपूर विभागास दहा कोटी असे एकूण ४९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

त्याचबरोबर खरीप २०२५ आणि यापुढील कालावधीकरिता केंद्र सरकार अथवा राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांच्या नुकसानीपोटी द्यावयाची भरपाई दर आणि निकष २७ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार देय राहतील. यामुळे एक जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना अधिक्रमित करण्यात आल्या आहेत, असे श्रीमती सोनिया सेठी यांनी सांगितले.यावेळी वन मंत्री गणेश नाईक आणि बंदरे विकास मंत्री निलेश राणे यांनी पावसामुळे सुकी मासळीचे नुकसान झाले आहे. त्यांनी मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. यावर मदत पुनर्वसन विभागाने यावर प्रस्ताव सादर करावा अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पावसामुळे रस्ते आणि छोट्या पुलांचे नुकसान झाले आहे. त्यांची दुरुस्ती केली जावी, असे सांगितले. ग्राम विकास विभागाकडून ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्ती करण्यासाठी सूचना द्याव्यात अशी मागणी उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी केली. यावर गेल्या पंधरा दिवसांत ज्या भागात रेड अलर्ट घोषित केला होता तेथील रस्ते आणि पुल दुरुस्ती बाबत विचार केला जावा, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी उजनी धरणाच्या जलाशयात १४.५ टीएमसी पाणी साठा आहे. जायकवाडी धरणात २८ टीएमसी तर गोसीखुर्द धरणात ३.७२ टीएमसी पाणीसाठा असल्याचे त्यांनी सांगितले.राज्यातील पाणी टंचाईच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झाली आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत टँकरने पुरवठा करण्याच्या गावांच्या संख्येत दोनशेने तर टँकरच्या संख्येत ३३६ ने घट झाली आहे. छत्रपती संभाजी नगर आणि जालना या दोन जिल्ह्यांमध्ये टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे, असे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांनी सांगितले.

---

# शंकरपूरात मध्यरात्री सहा दुकाने,दोन घरे फोडली; व्यापाऱ्यांत भीतीचं वातावरण

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर गावात रविवारी रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी सहा दुकाने आणि दोन घरे फोडून खळबळ उडवून दिली. बसस्थानक परिसरातील ग्रामपंचायतच्या चाळीत असलेल्या पाच दुकानांचे कुलूप फोडून चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला. यात पवन शेरकी यांचे पवन कृषी केंद्र, येलसेट्टीवार यांचे सायकल स्टोअर्स, मनोज जाजू यांचे वस्त्र भांडार, चेतन घोडे यांचे देवा एंटरप्रायजेस रिवायंडींग सेंटर, दिवाकर बावनकर यांचे किराणा दुकान आणि मुकुंदा बावनकर यांचे कृषी केंद्र या दुकानांचा समावेश आहे. काही दुकानांचे कुलूप फोडण्यात यश आल्याने आत प्रवेश मिळवण्यात आला, तर काही ठिकाणी चोरट्यांना अडथळा आल्याने चोरी अयशस्वी ठरली. मात्र, मुकुंदा बावनकर यांच्या दुकानातील सीसीटीव्ही



कॅमेरा फोडण्यात आल्यामुळे तपासात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, गावातील शिक्षक कॉलनीत राहणाऱ्या शरीफउद्दीन सय्यद यांच्या घराचे कुलूपही चोरट्यांनी फोडले. सुदैवाने त्या वेळी घरात कोणी नसल्यामुळे कोणतीही मौल्यवान वस्तू चोरीस गेली नाही. मात्र त्याच घरात भाडेकरू म्हणून वास्तव्यास असलेल्या जिल्हा परिषद शिक्षिका अश्विनी भुते यांच्या घरात चोरट्यांनी हात साफ केला. त्यांच्याकडून सुमारे पाच ग्रॅम सोनं, चार तोळे चांदी व सहा हजार रुपये रोख रक्कम चोरीस गेल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची माहिती मिळताच सहायक पोलीस उपनिरीक्षक दुर्गेश नन्नावरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, अधिक तपास सुरू असल्याचे सांगितले आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांत शंकरपूर परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने व्यापारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. परिणामी, रात्रपाळीत पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी व्यापारी संघटनांकडून जोर धरत आहे.

---

# कोकणात राजकीय भूकंप?; मनसे नेते वैभव खेडेकर नाराज पक्ष सोडण्याच्या तयारीत

**मुंबई । विराम पवार**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला कोकणात मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पक्षाचे सरचिटणीस वैभव खेडेकर सध्या नाराज असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. काही दिवसांपूर्वी रत्नागिरीच्या चिंचघर येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात खेडेकर हे शिंदे गटातील दिग्गज नेत्यांसोबत एकाच व्यासपीठावर दिसले. त्यानंतर त्यांच्या नाराजीच्या बातम्यांना अधिक बळ मिळाले आहे.त्या कार्यक्रमात शिवसेनेचे वरिष्ठ नेते रामदास कदम, मंत्री उदय सामंत, शंभूराज देसाई, योगेश कदम आणि माजी आमदार संजय कदम उपस्थित होते. त्याच व्यासपीठावर वैभव खेडेकर यांचीही उपस्थिती चर्चेचा विषय ठरली. यावेळी रामदास कदम यांनी खेडेकर यांच्यावर प्रेमाचे उद्गार काढत, खेडेकरांना राज ठाकरेंकडे मीच घेऊन गेलो होतो, ते माझे



राजकीय शिष्य आहेत, असे स्पष्ट केले. तसेच, आपण एका कुटुंबातली माणसं आहोत, पुढे काय करायचं हे त्यांना माहिती आहे,अशा सूचक शब्दांत त्यांनी शिंदे गटात येण्याचे संकेत दिले. उदय सामंत यांनीही मंचावरूनच साद घतली आहे.

या प्रसंगानंतर काही दिवसातच वैभव खेडेकर यांनी आपल्या सोशल मीडिया स्टेटसवर जय महाराष्ट्र' असा संदेश ठेवत एक संकेत दिला. त्यावरून त्यांच्या संभाव्य निर्णयाबाबत तर्क–वितर्क सुरु झाले आहेत. खेड व दापोली परिसरात खेडेकर यांचा मजबूत जनसंपर्क आहे. त्यामुळे जर त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला, तर कोकणात मनसेला मोठे नुकसान सहन करावे लागू शकते.जुने पदाधिकारी बाजूला पडल्याची भावना वैभव खेडेकर यांनी व्यक्त केल्याचे सांगितले जाते. सध्या त्यांनी अधिकृतपणे कोणतीही घोषणा केली नसली, तरी त्यांच्या हालचालींवर राजकीय वर्तुळाचे बारकाईने लक्ष आहे.

---

# अकरावी प्रवेशासाठी दहा हजारांची लाच मेहुणबारे विद्यालयातील दोन शिक्षक धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

**धुळे । उमाकांत अहिरराव**

शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेचा गैरफायदा घेत विद्यार्थ्यांकडून दहा हजार रुपयांची लाच स्वीकारताना मेहुणबारे (ता. चाळीसगाव) येथील गिरणा विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील दोन शिक्षकांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे यांनी रंगेहाथ अटक केली. ही धडक कारवाई धुळे एसीबीचे पोलिस निरीक्षक सचिन साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली २९ मे रोजी पार पडली. शिक्षण क्षेत्रात लाचखोरीचा हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.अटक करण्यात आलेल्यांमध्ये उपशिक्षक गुलाब वीरभान साळुंखे (वय ४५, रा. मेहुणबारे, ता. चाळीसगाव) व उल्हास भास्करराव





बागुल (वय ४२, रा. आदर्श नगर, प्लॉट क्र. ९, चाळीसगाव) यांचा समावेश आहे.

तक्रारदार यांच्या मुलाने मेहुणबारे विद्यालयातून दहावी उत्तीर्ण केल्यानंतर त्याच संस्थेच्या विज्ञान शाखेत अकरावी वर्गात प्रवेश घेण्यासाठी २७ मे रोजी विद्यालयात संपर्क साधला. त्यावेळी शिक्षक गुलाब साळुंखे आणि लिपिक पंजाबराव देशमुख यांनी संस्थेच्या सचिव व संचालकांच्या सूचनेचा हवाला देत प्रवेशासाठी २० हजार रुपयांची मागणी केली. त्यात १० हजार रुपये ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर व उर्वरित १० हजार रुपये प्रवेशावेळी जमा करावेत, अन्यथा प्रवेश प्रक्रिया पूर्ण होणार नाही, असे स्पष्टपणे सांगण्यात आले.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या तक्रारदाराने लगेचच २८ मे रोजी धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर २९ मे रोजी लाच पडताळणी करण्यात आली आणि ठरल्याप्रमाणे लाच घेताना दोन्ही शिक्षकांना एसीबीने रंगेहाथ पकडले.

या कारवाईमुळे शिक्षण संस्थांमध्ये होणाऱ्या आर्थिक व्यवहारांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी कार्यरत असलेल्या शिक्षकांनीच लाच मागितल्याने पालक वर्गामध्ये तीव्र नाराजी आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी होत आहे.

---

# खांबजवळ थरारक अपघात! भरधाव कारने एसटीला दिली जोरदार धडक; दाम्पत्य गंभीर जखमी

**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावर खांब गावाजवळ रविवारी (१ जून) सायंकाळी घडलेल्या अपघातात भरधाव कारने एसटी बसला समोरासमोर धडक दिल्याने दोन जण गंभीर जखमी झाले. जखमींमध्ये कारचालक संतोष मेढेकर आणि त्यांची पत्नी कविता मेढेकर यांचा समावेश आहे. अपघातात कारचेही मोठे नुकसान झाले आहे.

ही घटना रविवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, एसटी बस (क्र. एमएच–०८–एपी–५८२५) चालक संतोष काशीराम बुधकर (वय ४०) हे कोलाडहून महाडमार्गे मुंबईच्यादिशेने प्रवासी घेऊन जात होते. त्याच वेळी कार (क्र. एमएच–०६–बीयू–९९३६) चालक संतोष मेढेकर हे पत्नी कविता मेढेकर यांच्यासह मुंबईकडे जात असताना, खांबजवळ गाडीवरील ताबा सुटल्याने कार थेट समोरील एसटी बसवर आदळली.

अपघात इतका भीषण होता की कारचे पुढचे मोठे



नुकसान झाले असून, कारमधील दोघेजण गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच कोलाड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना तात्काळ रुग्णालयात हलवले.या अपघाताबाबत कोलाड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. घटनास्थळाची पाहणी तपासी अंमलदारांनी केली असून, प्राथमिक माहितीनुसार चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात घडल्याचे समोर आले आहे.

---

# बल्लारपूर मतदारसंघातील ५८ नेत्ररुग्ण मोफत शस्त्रक्रियेसाठी नागपूरला रवाना

## आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून राबविण्यात येतोय दृष्टीदान उपक्रम

### १५ हजारांहून अधिक शस्त्रक्रिया, ३५ हजारांना मोफत चष्मे

**सुधीर मुनगंटीवार यांच्या सामाजिक बांधिलकीतून आजवर विविध उपक्रमांतून १५ हजारांहून अधिक रुग्णांवर मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तसेच ३५ हजारांपेक्षा अधिक नागरिकांना मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना नवदृष्टी मिळवून देणारा हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यासाठी आशेचा किरण ठरतो आहे.**

**मुल । प्रतिनिधी**

राज्याचे माजी मंत्री आणि बल्लारपूरचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया मोहिमेचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडला असून, मुल व राजोली येथून एकूण ५८ नेत्ररुग्णांना शस्त्रक्रियेसाठी नागपूरला रवाना करण्यात आले आहे. नागपूर येथील शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँन्ड रिसर्च सेंटर, वानाडोंगरी येथे या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

श्री माता कन्यका सेवा संस्था, चंद्रपूर आणि शालिनीताई मेघे हॉस्पिटल, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात मोफत नेत्र तपासणी शिबिरे घेण्यात आली होती. तपासणीनंतर शस्त्रक्रियेस पात्र ठरलेल्या ४२ रुग्णांना मुल येथून तर १६ रुग्णांना राजोली येथून रवाना करण्यात आले. ने–आण, निवास, भोजन आणि सर्व उपचारांचे संपूर्ण खर्च रुग्णालयाकडून उचलण्यात आले असून, शस्त्रक्रिया पूर्णतः निःशुल्क असेल.



### दृष्टीदान मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या दृष्टीदान उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. विसापूर, नांदगाव, हळस्ती, बामणी, कळमना, जूनोना, चीचपेल्ली, अजयपूर, कोठारी, दुर्गापूर, इंदिरा नगर, राजोली आणि मुल येथे घेतलेल्या शिबिरांमध्ये शेकडो रुग्णांनी नेत्रतपासणी केली.**

## शिक्षण अधुरं राहिलं, पण स्वप्न मात्र पूर्ण केलं...

# स्वत: सातवी नापास, पण दोन्ही मुलांना पोलिस दलात भरती करून 'साहेब' बनवणाऱ्या सूर्यभान वाघमोडे यांचा संघर्षमय प्रवास



**प्रा. राजेश गायकवाड । सोलापूर**

शैक्षणिक प्रवास अर्धवट राहिला तरीही मुलांच्या भविष्यासाठी न थकता, न थांबता अखंड प्रयत्न करणारा एक बाप सूर्यभान एकनाथ वाघमोडे. शिक्षण न मिळालेली खंत त्यांनी आपल्या मुलांच्या जीवनात संधीच्या रूपात परिवर्तित केली. ही गोष्ट आहे करमाळा तालुक्यातील निलज या लहानशा गावातील, परंतु तिचा संदेश संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरतो आहे. सूर्यभान यांचे वडील एकनाथ वाघमोडे व आई सरूबाई वाघमोडे दोघेही पूर्णतः अशिक्षित. घरात तुटपुंजा खर्च, मोलमजुरीवर घर चालवणं, चार पोरांचा उदरनिर्वाह हेच त्यांचं दैनंदिन जगणं. अशा पार्श्वभूमीत सूर्यभान यांचे शिक्षण सातवीपर्यंतच मर्यादित राहिले. मात्र शिक्षणाविषयी असलेला आदर, महत्त्वाची जाण आणि स्वतःच्या अपूर्णतेची बोच मनात खोलवर रुजलेली होती. वयाच्या बाविसाव्या वर्षी सखुबाई लोखंडे यांच्याशी विवाह झाला. नव्या संसाराचा प्रारंभ



नानासाहेब वाघमोडे



गहिनीनाथ वाघमोडे

होताच, दोघांनीही आयुष्याला एक ध्येय दिलं आपली मुलं आपल्यासारखी राहू नयेत! रक्ताचं पाणी करून त्यांना शिक्षण दिलं, संस्कार दिले आणि स्वाभिमानी जीवन जगण्याची प्रेरणा दिली. मोठा मुलगा गहिनीनाथ वाघमोडे सध्या मुंबई पोलिस मुख्यालयात ओएस (ऑर्डरली स्टाफ) पदावर कार्यरत आहे. तर दुसरा मुलगा दीपक ऊर्फ नानासाहेब वाघमोडे मुंबई पोलिस दलात पोलीस शिपाई म्हणून काम करत आहे. विशेष म्हणजे त्यांची एकुलती एक कन्या तिचा पती देखील पोलिस खात्यात कार्यरत आहे. या कुटुंबाच्या यशात सूर्यभान यांचे मामा प्रल्हाद लोखंडे, हे सेवानिवृत्त पीएसआय (पोलीस उपनिरीक्षक) यांचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे ठरले. स्पर्धा परीक्षांमधील बारकावे, अभ्यासातील शिस्त आणि आत्मविश्वास यांचे बीज त्यांनी या भावंडांमध्ये पेरले. यशाच्या शिखरावर पोहोचूनही वाघमोडे कुटुंबाने आपल्या मुळांना विसरलं नाही. गावातील दिंडीसाठी भोजन व्यवस्था, बाळूमामा देवस्थानाचे बांधकाम, देवी मंदिर सुधारणा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिरे अशा प्रत्येक ठिकाणी त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. या संघर्षमय प्रवासाचा सारांश सांगताना सूर्यभान वाघमोडे म्हणतात, स्पर्धेच्या युगात टिकून राहायचं असेल, तर अभ्यासात सातत्य हवे. कष्टाचा पर्याय नाही. आजही त्यांची मुलं जेव्हा सुट्टीसाठी घरी येतात, तेव्हा शेतीच्या कामात आईवडिलांना मदत करतात ही संस्कृतीच त्यांच्या यशामागे आहे. आपल्याकडे नेहमी ऐकायला मिळतं डॉक्टरचा मुलगा डॉक्टर, वकिलाचा वकील. पण याला छेद देणारे सूर्यभान वाघमोडे यांचं कुटुंब शेतकऱ्याचा मुलगा पोलिस अधिकारी होऊ शकतो, हे सिद्ध करतं. ही गोष्ट केवळ त्यांच्या कुटुंबाची नाही, तर ती प्रत्येक ग्रामीण, गरीब, संघर्षशील घरातील पालकांसाठी आशेचा किरण आहे.या संघर्षशील आणि प्रेरणादायी कुटुंबाच्या यशाच्या वाटचालीस दैनिक सह्याद्री कडून मनःपूर्वक शुभेच्छा!

---

### अपघातग्रस्ताला वाचवणारे देवदूत ठरले धामणगांवकर

## संतोष वाघमारे, १०८ रुग्णवाहिका चालक व डॉक्टर यांची माणुसकीचे दर्शन

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

अमरावतीजवळील पोहरा रोडवरील भानखेड फाट्याजवळ सोमवारी रात्री आठच्या सुमारास दोन दुचाकींमध्ये झालेल्या अपघातात साईनगर येथील ५० वर्षीय संतोष शहारे हे गंभीर जखमी झाले. या अपघातात मलकापूरकडे जाणारे एक दाम्पत्य देखील सहभागी होते.

अपघातानंतर संतोष शहारे हे रस्त्यावर गंभीर जखमी अवस्थेत पडले होते. अंधार असल्याने आणि परिस्थिती समजून घेण्यात वेळ जात असल्याने आजूबाजूचे लोक केवळ बघ्याची भूमिका घेत होते.

या वेळी धामणगाव रेल्वे येथून अमरावतीला एका रिसेप्शनसाठी जात असलेले पत्रकार संतोष वाघमारे हे पत्नी आणि मुलीसह त्या ठिकाणी आले. गर्दी पाहून त्यांनी वाहन थांबवले आणि अपघातग्रस्ताची स्थिती पाहून तात्काळ मदतीस धावले. योगायोगाने त्याच वेळी घटनास्थळी अमरावतीकडे जाणारी १०८ रुग्णवाहिका आली. पत्रकार वाघमारे यांनी रुग्णवाहिका थांबवून त्यातील चालक अंकुश डुमरे व डॉक्टर तेजस सोळंके यांना मदतीसाठी विनंती केली. तत्काळ प्रतिसाद देत त्यांनी अपघातग्रस्त संतोष शहारे यांना रुग्णवाहिकेत घेतले आणि अमरावतीतील ईर्विन रुग्णालयात दाखल केले. रिसेप्शनला उशीर होत असूनही कोणतीही ओळख नसताना अपघातग्रस्ताची मदत करून पत्रकार संतोष वाघमारे यांनी माणुसकी जिवंत असल्याचे उदाहरण दिले.



तसेच, १०८ रुग्णवाहिकेत आधीपासून रुग्ण असतानाही चालक व डॉक्टरांनी दुसऱ्या रुग्णाची मदत करत आपले कर्तव्य पार पाडले. या माणुसकीच्या घटनामुळे धामणगांव रेल्वे परिसरात पत्रकार वाघमारे, चालक अंकुश डुमरे आणि डॉक्टर तेजस सोळंके यांचे जोरदार कौतुक होत आहे. अशा संवेदनशील व तत्पर कृतीमुळे समाजात अजूनही माणुसकी शिल्लक असल्याची जाणीव निर्माण झाली आहे.

---

### जळगाव शिवारातील दोन डीपी बंद; पिकांचे नुकसान

## उमेश भुजाडणे यांच्या नेतृत्वात वीज वितरण कार्यालयात शेतकऱ्यांचा धडक मोर्चा

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

जळगाव मंगरूळ येथील ठाकरे डीपी व पाटील डीपी गेल्या एका महिन्यापासून बंद असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून, भाजीपाला आणि संत्रा पिके कोमेजण्याच्या मार्गावर आहेत. वारंवार तक्रारी करूनही वीज वितरण कंपनीने दुर्लक्ष केल्याने आज संतप्त शेतकऱ्यांनी उमेश भुजाडणे यांच्या नेतृत्वात मंगरूळ दस्तगीर येथील वीज वितरण कार्यालयावर धडक दिली.

या आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी वीज अभियंता खान यांची भेट घेतली आणि बंद डीपी तत्काळ दुरुस्त करून वीजपुरवठा सुरळीत करण्याची जोरदार मागणी केली. शेतात पाणी न मिळाल्यामुळे भाजीपाला पिके वाया जात असून, आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. तरीही विभागाकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला.या बैठकीत वीज वितरण विभागाने दोन दिवसांची मुदत मागितली असून, तोपर्यंत वीजपुरवठा पूर्ववत न झाल्यास कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा तीव्र इशारा उमेश भुजाडणे यांनी दिला आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, जर दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत झाला नाही, तर कार्यालय ताब्यात घेऊन वीज मिळेपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही.



निवेदन देताना शेतकरी अजयराव समरीत, रामेश्वर सरोदे, विजयराव वानखडे, बंडू भोयर, चंद्रभानजी तडस, लीलाधर वानखडे आदी उपस्थित होते. या प्रकारामुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी असून, वीज वितरण विभागाने तत्काळ पावले उचलावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

---

## धामणगाव रेल्वे येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याचे आयोजन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हिडीओद्वारे उद्घाटन;आमदार प्रताप अडसड,पत्रकार कमलकिशोर छांगाणी यांची प्रमुख उपस्थिती

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

धामणगाव रेल्वे येथील संत बगाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने शुक्रवार, दिनांक ६ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणार आहे.

शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रताप प्रतिभाताई अरुणभाऊ अडसड यांची उपस्थिती राहणार आहे, तर प्रमुख वक्ते म्हणून ख्याती प्राप्त पत्रकार कमलकिशोर दुर्गादास छांगाणी मार्गदर्शन करणार आहेत.या कार्यक्रमाची संकल्पना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांची आहे.कार्यक्रमासाठी आयएमसी अध्यक्ष हेमंत जाधव, सदस्य अजय (बंटी) ठाकूर, प्रशांत मुन, आनंद झामरे, श्रीकांत पर्बत यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे.कार्यक्रमासाठी नागरिकांना, विद्यार्थ्यांना आणि औद्योगिक क्षेत्रातील व्यक्तींना उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे कार्यकारी प्राचार्य पी. एच. धोटे, तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

---

## आचार्य अत्रे महाराज ग्रामगीतेचे निःसीम प्रचारक-चेतन परळीकर

**वर्धा । प्रतिनिधी**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे रचनात्मक कार्य आद्य रामकृष्णदादा बेलूरकर यांनी सुरू केले. त्या कार्याची धग आचार्य रामकृष्ण अत्रे महाराजांनी अधिक प्रभावीपणे पुढे नेत ग्रामगीतेच्या माध्यमातून हजारो निःसीम सेवक निर्माण केले. मी देखील त्या सेवकांपैकी एक आहे, असे भावनिक उद्गार गुरुदेव युवा मंचाचे चेतन परळीकर यांनी व्यक्त केले. आचार्य अत्रे महाराज यांच्या अमृत महोत्सवानिमित्त दिनांक २ जून २०२५ रोजी, वर्धा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. हा सोहळा आद्य ग्रामगीताचार्य रामकृष्णदादा बेलूरकर फिरते वाचनालय, धन्वंतरी नगर सेवाग्राम, तुळजापूर आणि लहानुजी देवस्थान समिती, वर्धा यांच्या संयुक्त



विद्यमाने संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या तैलचित्र पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी मी पाहिलेले अत्रे महाराज आणि त्यांचे कार्य या विषयावर विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. त्यात चेतन परळीकर, रमेश भोले, कुसुमताई पावडे, प्रकाश आलवडकर, सुरेंद्र बेलूरकर, चंद्रशेखर दंडारे यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले. प्रकाश आलवडकर यांनी सांगितले की, आजघडीला रामकृष्ण अत्रे महाराज यांच्या रूपाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य पुढे नेणारी नवी पिढी तयार झाली आहे. चंद्रशेखर दंडारे यांनी नमूद केले की, साध्या परिस्थितीतून आचार्य अत्रे महाराजांनी आपल्या प्रचार कार्याची छाप गुरुदेव भक्तांमध्ये निर्माण केली. अशीच निष्ठा असलेले प्रचारक निर्माण होणे गरजेचे आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे, अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण वर्षभर विविध उपक्रम राबवले जातील. त्यात उन्हाळी शिबिरे-वरूड, सेवाग्राम प्रचारक भजन मेळावा,ग्रामगीता ओवी अनुभव मेळावा,युवा विचारमंथन,ग्रामस्वच्छता अभियान,आरोग्य शिबीर,निबंध व चित्रकला स्पर्धा,गुरुदेव सेवकांचा सत्कार समारंभ यावर्षी आचार्य अत्रे महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित पुस्तक प्रकाशित होणार असून, त्याचा प्रकाशन सोहळा श्रीक्षेत्र टाकरखेड येथील लहानुजी महाराज मंदिरात होणार आहे. हे पुस्तक सुरेंद्र बेलूरकर लिखित आहे. कार्यक्रमाचे संचालन सुरेंद्र बेलूरकर यांनी केले. तर बबनराव गोलाईत यांनी आभार प्रदर्शन केले. यशस्वी आयोजनासाठी सचिन सिंघम, बबनराव गोलाईत, श्याम सोरटे, शांताराम सोरटे, विजय राऊत व इतर गुरुदेव भक्तांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रवंदनाने करण्यात आली.

---

### बदलापूरमध्ये टीओडी मीटर बसवण्याच्या विरोधात महाविकास आघाडी आक्रमक!

# महावितरणकडून 'सक्ती केली जाणार नाही'चे लेखी आश्वासन; नागरिकांतून समाधानाचा सूर

**बदलापूर । प्रतिनिधी**

राज्यातील स्मार्ट मीटरविरोधात असलेला जनतेचा विरोध अद्याप शमलेला नसतानाच, महाराष्ट्र महावितरण कंपनीकडून 'टीओडी (टाईम ऑफ डे)' मीटर बसवण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. मात्र कोणतीही पूर्वसूचना न देता, थेट नागरिकांच्या घरी हे मीटर बसवले जात असल्यामुळे बदलापूर शहरात असंतोष उसळला आहे. याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने महावितरणच्या कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले.या आंदोलनानंतर महावितरणच्या वरिष्ठ अभियंत्यांनी यापुढे कोणत्याही नागरिकावर टीओडी मीटर सक्तीने बसवले जाणार नाही, असा लेखी दिलासा दिला, ज्यामुळे आंदोलकांनी समाधान व्यक्त केले.मागील आठवड्यात खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांनी टीओडी मीटर सक्ती न करण्याच्या सूचना महावितरण अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. मात्र, त्या सूचनांकडे दुर्लक्ष करून ४०,००० हून अधिक टीओडी मीटर नागरिकांच्या परवानगीशिवाय बसवले गेल्याचे उघड झाले. यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या सर्व प्रकरणात एक धक्कादायक बाब म्हणजे अदानी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी स्वत:ला महावितरणचे कर्मचारी म्हणून ओळख देत सोसायट्यांमध्ये टीओडी मीटर बसवले आहेत. टीओडी मीटरमुळे वीजबिल वाढणार की काय, अशी भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली असून विजेच्या दरात पारदर्शकता नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत.शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि काँग्रेस या पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनात सहभाग घेत नागरिकांच्या हक्कांसाठी आवाज उठवला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस अविनाश देशमुख यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, अदानी हा देशभक्त नसून व्यापारी आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता मीटर बसवणे म्हणजे नागरिकांच्या अधिकारांवर गदा आणण्याचा प्रकार आहे. पुढीलवेळी असे प्रकार झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतील.सध्या तरी महावितरणकडून आंदोलनकर्त्यांना सक्ती केली जाणार नाही असे लेखी पत्र देण्यात आले आहे. परंतु यामुळे सर्व समस्या सुटतीलच, असे नाही. नागरिकांनी सतर्क राहून वीजवितरण कंपन्यांच्या धोरणांवर लक्ष ठेवणे, माहिती अधिकाराचा वापर करणे व निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे, हीच यापुढची गरज आहे.



# भाजपाने पक्ष फोडण्यासाठी जे दलाल नेमले आहेत त्यात गिरीश महाजन यांचा पहिला नंबर

## शिवसेना संपविणे तुमच्या दहा पिढ्यांना शक्य नाही शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांचा हल्लाबोल

**मुंबई । विराम पवार**

नाशिकमध्ये भाजप नेते आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी केलेल्या 'उद्धव ठाकरे यांचा पक्ष जमीनदोस्त होणार' या वक्तव्यावर शिवसेना (ठाकरे गट) नेते आणि खासदार संजय राऊत यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. संजय राऊत म्हणाले, गिरीश महाजनांचा पक्ष मुळात जागेवर आहे का? ठेकेदार, भ्रष्ट आणि धमक्यांच्या आधारावर भाजप राज्य चालवत आहे. त्यांनी पोलिसांचा वापर करून आणि पैशांची ताकद वापरून लोकांना फोडण्याचा उद्योग चालवला आहे. भाजपने जे पक्ष फोडण्यासाठी दलाल नेमले आहेत त्यात गिरीश महाजन यांचा क्रम पहिला आहे.संजय राऊतांनी असा खळबळजनक दावा केला की, जेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते, तेव्हा महाजन यांच्याविरुद्ध चौकशी सुरू होती. त्यावेळी ते पक्ष बदलण्याच्या तयारीत होते. ते म्हणत होते की मी राजकारणातून बाहेर पडतो, मी शांत बसतो. आता हेच लोक आम्हाला शिकवायला निघाले आहेत. राऊत यांनी पुढे असेही म्हटलं की,

हे डरपोक आणि घाणेरडे राजकारणी आहेत.बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने तुम्हाला चड्डीची नाडी बांधायला शिकवली. तुम्ही कोण होता राजकारणात? तुम्हाला लाज वाटली पाहिजे की त्या पक्षाबद्दल 'जमीनदोस्त' अशी भाषा करत आहात.राऊत यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, अनेकांनी आम्हाला संपवण्याचा प्रयत्न केला, पण आम्ही अजून ताकदीने उभे आहोत. अमित शाह यांनीही शिवसेना संपवण्यासाठी प्रयत्न केले, पण ते अयशस्वी झाले. महाराष्ट्र द्रोही आणि मराठी द्रोही गिरीश महाजन हे केवळ मोहरा आहेत.शेवटी, संजय राऊत म्हणाले, पाच-पंचवीस माणसं फोडल्याने पक्ष फोडला जात नाही. नरेंद्र मोदी म्हणतात काँग्रेसमुक्त भारत, पण त्यांच्याच काळात काँग्रेस अधिक बळकट झाली. गिरीश महाजन यांचा राजकीय अभ्यास कमकुवत आहे. नाचेगिरी करून राजकारण होत नाही. गिरीश महाजन यांच्या वक्तव्यानंतर सुरु झालेला हा वाद सध्या राज्याच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरतो आहे. संजय राऊत यांच्या प्रतिउत्तराने हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे.



# पावसामुळे शेतशिवारात सापांचा वावर वाढला शेतकरी बांधवांनो 'अशी' घ्या काळजी!

## सावधगिरीच सर्पदंशावरील सर्वोत्तम उपाय-सर्पमित्रांचा इशारा

**मोहोळ । प्रतिनिधी**

वळवाच्या पावसानंतर खरिपाच्या तयारीला वेग आला असताना, शेतशिवारात सापांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शेतीची मशागत, अडगळीतील साफसफाई आणि गोठ्यांची व्यवस्था करताना अनेक वेळा शेतकऱ्यांना सर्पदंशाचा धोका उद्भवतो. त्यामुळे शेतकरी बांधवांनी खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे असल्याचा इशारा सर्पमित्रांकडून देण्यात येत आहे.पावसाळा सुरु होताच शेतात तण, पालापाचोळा, दगड-गोटे आणि झुडपांची साफसफाई सुरू होते. याचवेळी अडगळीतील जागा हलविल्या जातात. त्या ठिकाणी आसरा घेतलेले साप, विंचू यामुळे बाहेर पडतात. अनेक वेळा हे प्राणी अचानकपणे समोर येतात आणि कामाच्या घाईत सर्पदंश घडतो.विशेषतः पावसाचे



पाणी सापांच्या बिळांत शिरल्याने ते आसरा शोधण्यासाठी घरांत अथवा शेतीच्या आसपासच्या जागांमध्ये येतात. यामुळे घरातही सर्पदंशाच्या घटना घडण्याचे प्रमाण वाढले आहे. नाग, घोणस, मण्यार आणि फुरशे हे विषारी साप असून त्यांचा दंश प्राणघातक ठरतो.शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांनी पावसाळ्यात सर्पदंशाचा धोका ओळखून पुरेशी काळजी घेतल्यास अनावश्यक जीवितहानी टाळता येऊ शकते. शेतमालासोबतच स्वतःच्या सुरक्षेलाही प्राधान्य देणे ही काळाची गरज बनली आहे.

### मे ते ऑक्टोबर कालावधीत धोका अधिक

**कोल्हापूर येथील सर्पमित्र धनंजय जोशी यांच्या माहितीनुसार, मे ते ऑक्टोबर या कालावधीत राज्यात सर्पदंशाच्या घटनांमध्ये वाढ होते. याच कालावधीत शेतीची कामे अधिक प्रमाणात सुरू असल्याने शेतकऱ्यांचा संपर्क नैसर्गिकरित्या शिवारातील सापांशी अधिक होतो.**

### शेतकरी बांधवांनो, 'अशी' घ्या काळजी...

**शेतात काम करताना नेहमी गमबूट व दंड झाकणारे कपडे परिधान करावेत.**
**अडगळीच्या किंवा झुडपी जागांमध्ये जाण्यापूर्वी *पाय आपटून सावधता बाळगावी.**
**गवत कापण्यापूर्वी परिसरात सापांची उपस्थिती आहे का, याची खात्री घ्यावी.**
**घरात आणि अंगणात साफसफाई करताना खोल,अंधाऱ्या जागी सावधगिरीने वागावे.**
**सर्पदंश झाल्यास घाबरून न जाता *तत्काळ जवळच्या रुग्णालयात उपचार घ्यावेत**
**नाग, घोणस, मण्यार वगळता इतर साप बिनविषारी असतात, त्यामुळे =गोंधळ न करता वेळीच उपचार घ्यावेत.**

# वैजापूर पोलिस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार सत्यजीत ताईतवाले यांचा सत्कार



**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर पोलिस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार सत्यजीत ताईतवाले यांचा नुकताच सत्कार करण्यात आला आहे. सत्यजीत ताईतवाले यांनी वैजापूर पोलिस स्टेशनच्या ठाणेदारपदी नियुक्ती मिळवली असून त्यांनी नवे पदभार स्वीकारले आहे.त्यांच्या नियुक्तीपूर्वी, पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे यांना छत्रपती संभाजीनगर येथील आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. सत्यजीत ताईतवाले यांना यापूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील सायबर पोलिस ठाण्यात काम करताना पाहायला मिळाले.कडक आणि शिस्तप्रिय कार्यशैलीसाठी ओळखले जाणारे सत्यजीत ताईतवाले यांनी विरगाव, शिऊर, मुंबई, गंगापूर येथेही महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.वैजापूर तालुक्याचे प्रतिनिधी अर्जुन शिंदे (दैनिक सह्याद्री), भरत सोनवणे (दैनिक चालू वार्ता), आणि अनिल सूर्यवंशी (इंडिया न्यूज २८) यांनी त्यांचे स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# खारापटीतून थेट इंग्लंडपर्यंत! प्रभातची मिक्स बॉक्सिंगमध्ये झंझावाती कामगिरी

**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

रोहा तालुक्यातील खारापटी या छोट्याशा गावातून आंतरराष्ट्रीय मिक्स बॉक्सिंगच्या रंगमंचावर झळकलेला प्रभात प्रलोभ पोकळे याने नेपाळमध्ये पार पडलेल्या 'पहिल्या आशियाई मिक्स बॉक्सिंग अजिंक्यपद २०२५' स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत आपल्या गावाचे, आई-वडिलांचे आणि भारत देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. विशेष म्हणजे आता त्याची निवड इंग्लंड येथे होणाऱ्या वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिपसाठी झाली असून, खारापटीतील हा युवक थेट जागतिक स्तरावर आपली छाप पाडण्यास सज्ज झाला आहे.

३० व ३१ मे रोजी नेपाळमधील काठमांडू येथे झालेल्या या स्पर्धेत प्रभात पोकळे याने भारताचे नेतृत्व करत उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन केले. विविध देशांतील स्पर्धकांमध्ये बाजी मारत त्याने सुवर्णपदक मिळवले. या स्पर्धेत नेपाळ, भारत, भूतान, बांगलादेश,



श्रीलंका, इराण, अफगाणिस्तान, इराक आणि थायलंड या देशांच्या एकूण २५० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेतील पुरस्कार वितरण सोहळ्यात नेपाळ महानगरपालिकेचे महासचिव, नेपाळचे शासकीय अधिकारी, वर्ल्ड मिक्स बॉक्सिंगचे संस्थापक राकेश म्हसकर, एशियन मिक्स बॉक्सिंगचे अध्यक्ष नाथा कुमार, नेपाळ मिक्स बॉक्सिंगचे अध्यक्ष सुमन लामा आणि जर्मनीचे डब्ल्यूकेएफ प्रेसिडेंट उपस्थित होते.श्री धावीर महाराज रोहा रिक्षाचालक-मालक संस्थेचे सभासद प्रलोभ काशिनाथ पोकळे यांचा पुत्र प्रभात याच्या या कामगिरीमुळे संपूर्ण खारापटी गाव आणि रोहा तालुका भारावून गेला आहे. प्रभातने मिळवलेल्या यशाचे कौतुक करत संस्थेचे अध्यक्ष लीलाधर पांडुरंग मोरे, उपाध्यक्ष रुपेंद्र दिलीप मळेकर यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रभात व त्याच्या पालकांचा सत्कार केला.प्रभातच्या या यशाबद्दल रोह्यातील विविध संस्थांकडून व नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. गावातील युवकांनीही प्रभातकडून प्रेरणा घेऊन आपले क्षेत्र गाठावे, असा आशय अनेक जण व्यक्त करत आहेत. आता इंग्लंडमध्ये होणाऱ्या वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत प्रभात पुन्हा एकदा सुवर्ण कामगिरी करेल, अशी आशा रोहावासीय व्यक्त करत आहेत.

# शेतीसोबत दुग्ध प्रक्रिया उद्योगाची जोड आवश्यक-डॉ.वळकुंडे यांचे आवाहन

**मोहोळ । प्रतिनिधी**

दिनांक ४ जून २०२५ रोजी कोंबडवाडी येथे आयोजित कृषी विषयक कार्यक्रमात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र (सोलापूर) व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले डॉ. तानाजी वळकुंडे यांनी बदलत्या हवामान स्थितीत केवळ शेतीपुरती मर्यादा न ठेवता दुग्ध उत्पादन आणि दुग्ध प्रक्रिया उद्योगाकडे शेतकऱ्यांनी वळावे, असे आवाहन केले. कार्यक्रमात डॉ. स्वाती कदम यांनी तूर व उडीद आंतरपीक लागवडीचे महत्त्व पटवून दिले. डॉ. पिंकी रायगोंड यांनी सध्या पसरत असलेल्या तेल्या व मुळकुजव्या रोगांबाबत माहिती दिली आणि त्यावरील उपाय सुचवले. डाळिंब पिकांच्या अडचणी जाणून



घेत त्या संदर्भातही शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. याचवेळी कृषी संकल्प रथयात्रेच्या पार्श्वभूमीवर डॉ. वैरागर यांनी 'जलतारा' योजनेअंतर्गत पाणी पुनर्भरण आणि जलसंधारणाबाबत माहिती दिली. राष्ट्रीय भरडधान्य संशोधन संस्थेचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बसवराज रायगोंड यांनी सोलापूर जिल्ह्यातील भरडधान्य पिकांचे फायदे वविशेषतः ज्वारीच्या अर्थकारणावर सविस्तर विवेचन केले. कृषी पर्यवेक्षक एच. डी. गावडे यांनी 'ॲग्री स्टॅक'विषयी सविस्तर माहिती दिली तर कृषी उपअधीकारी विजय ढेरे यांनी 'भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना' व 'पीक विमा योजना' यांचा लाभ शेतकऱ्यांनी कसा घ्यावा, याबाबत माहिती दिली.या कार्यक्रमास कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामस्थ भिमराव कोकरे, बळीराम कोकरे, सचिन सरक, हनुमंत सरक व इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विज्ञान केंद्र मोहोळ आणि कोंबडवाडी ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिरूरमध्ये भ्रष्टाचारविरोधी समितीच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती



**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर नगर परिषद सभागृहात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती व ब्रिक्स ह्युमन राईट्स मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मार्गदर्शन शिबिर व नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाचे मार्गदर्शन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापुरकर आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाबुराव क्षेत्रे पाटील यांनी केले. यावेळी मंचावर पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सचिन खंडागळे, पुणे जिल्हा सोशल मीडिया प्रमुख अभिजीत चरपे पाटील, पुणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष योगेश भोसले आणि शिरूर तालुका संघटक मुनाफ पटेल उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर शिरूर तालुक्यातील नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. विशेष म्हणजे, यावेळी महिला पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली असून, संघटनेच्या समावेशकतेचा ठसा उमटवण्यात आला.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी शपथ घेतली की, शिरूर तालुक्यातील अवैध दारू, मटका, जुगार यांसारखे अनैतिक व्यवसाय मुळासकट बंद करण्यासाठी आणि समाजविघातक प्रवृत्तींना रोखण्यासाठी संघटना कायदेशीर मार्गाने लढा देईल.

मार्गदर्शन करताना बाबुराव क्षेत्रे पाटील म्हणाले, महिलांनी संघटित होऊन अन्यायाविरोधात आवाज उठवावा. संघटना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. तसेच, त्यांनी महिलांना स्थानिक स्तरावर उद्योग-व्यवसाय सुरू करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमामुळे शिरूर तालुक्यातील भ्रष्टाचारविरोधी चळवळीला नवे बळ मिळाले असून, नव्या पिढीतील पदाधिकाऱ्यांच्या सहभागामुळे गावपातळीवरील संघर्ष अधिक प्रभावी होणार आहे.

# भव्य आधार लिंक शिबीर-गोंडपिपरी तालुक्यात लाभार्थ्यांसाठी विशेष सुविधा

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

समस्त गोंडपिपरी तालुक्यातील नागरीकांसाठी विशेष सोय! राजुरा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार देवरावदादा भोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चा, गोंडपिपरी यांच्या संकल्पनेतून येत्या दि. ५ जून २०२५ रोजी गोंडपिपरीतील जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा, गांधी चौक येथे भव्य आधार लिंक शिबीर आयोजित करण्यात येत आहे.

या शिबीराचा मुख्य उद्देश म्हणजे वृद्ध, विधवा, दिव्यांग आणि अन्य निराधार लाभार्थ्यांचे खाते जे अजूनही आधारशी लिंक झालेले नाही, त्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देणे. यासाठी या शिबीरादरम्यान आधार कार्ड अपडेट करून दिले जाणार असून, त्याद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान योग्य प्रकारे जमा होण्यास मदत होईल.शिबीरात सहभागी होण्यासाठी लाभार्थ्यांनी आपले मूळ आधार कार्ड, बँक पासबुक आणि आधारशी लिंक असलेला मोबाईल नंबर नक्की सोबत आणावा, अशी विनंती करण्यात आली




आहे. शिबीराची वेळ सकाळी दहा वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत असेल.भारतीय जनता युवा मोर्चा, गोंडपिपरी या संस्थेकडून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, सर्व संबंधितांनी शिबीराचा लाभ घेऊन आपल्या खात्यांची योग्य नोंदणी करून घेण्याची विनंती केली आहे.

# सांडपाणी व कचरा व्यवस्थापनावर भर द्या–आमदार तरे यांची मागणी

**बोईसर । प्रतिनिधी**

तारापूर एमआयडीसीमध्ये रसायन, अभियांत्रिकी, औषधनिर्मिती व वस्त्रोद्योग या प्रमुख उद्योगांमधून मोठ्या प्रमाणात सांडपाणी व घनकचरा निर्माण होत आहे. या सांडपाण्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करावे, स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार द्यावा आणि एमआयडीसी लगतच्या ग्रामपंचायतींना मोफत पाणीपुरवठा करावा, अशी ठाम मागणी आमदार विलास तरे यांनी उद्योग भवन येथे झालेल्या बैठकीत केली.यावेळी आमदार तरे म्हणाले, बोईसर – तारापूर औद्योगिक वसाहतीत लघु, मध्यम व मोठ्या असे एकूण सुमारे १२१६ कारखाने कार्यरत आहेत. त्यामुळे पर्यावरणावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत गांभीर्याने विचार करून ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

आनंद सोमन विरुद्ध महाराष्ट्र शासन (ओ.ए. ५८/२०२४) या प्रकरणात राष्ट्रीय हरित लवादाने नेमलेल्या तज्ज्ञ समितीच्या सप्टेंबर २०२४ मधील अहवालात नमूद करण्यात आले आहे की, पास्थळ गावातील बोरवेलमधील पाणी अतिशय दूषित असून, ते पिण्यास तसेच घरगुती वापरासाठीही अयोग्य आहे. या अहवालात गावकऱ्यांना मोफत व सुरक्षित पाणीपुरवठा करावा, अशी शिफारस करण्यात आली होती, जी हरित लवादाने १४ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या आदेशाने मंजूर केली.

यावर भर देत आमदार तरे म्हणाले, फक्त पास्थळच नव्हे, तर एमआयडीसी लगतच्या सर्व ग्रामपंचायतींना मोफत पाणीपुरवठा करण्यात यावा.

या बैठकीस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय सावळकर, प्रादेशिक अधिकारी (ठाणे-१) उदय किसवे, उपअभियंता अविनाश संखे, म.प्र.नि.म. प्रादेशिक अधिकारी किरण हसबनीस, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे नरेश देवराज यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.बैठक संपल्यानंतर आमदार विलास तरे यांनी भाप्रसेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आणि सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली.



# लोकनेता जानू माळी यांचा यशस्वी जीवनप्रवास

**जव्हार । जितेंद्र मोरघा**

हिरडपाडा गावातील लोकनेता जानू येशू माळी हे समाजकारण आणि राजकारणाची योग्य सांगड घालत जिल्ह्यात आदिवासी समाजाच्या हितासाठी झटणारे लोकप्रिय नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याची दखल आता तालुक्याच्या सीमा ओलांडून जिल्हास्तरावर घेतली जात आहे.



माजी उपसभापती गंगा माळी यांचे बंधू असलेल्या जानू माळी यांच्या पुढाकाराने विजेच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विशेष म्हणजे पालघरचे लोकप्रिय खासदार हेमंत विष्णू सवरा यांच्या प्रयत्नातून हिरडपाडा परिसरात १३२ केव्ही क्षमतेचे वीज उपकेंद्र (पॉवर हाऊस) लवकरच पूर्णत्वास जाणार आहे. आपत्ती काळात, आरोग्य उपचारांमध्ये मदत करणे, अचानक मृत्यू झाल्यास अंत्यविधी व दशक्रिया यासाठी स्वतःच्या खर्चाने पुढाकार घेणे, हे त्यांचे एक वेगळे वैशिष्ट्य. गावातील रुग्णांना स्वतःच्या वाहनातून ठाणे, नाशिक, मुंबई, सेलवास आदी ठिकाणी नेऊन उपचार करून देणे, ही त्यांची नियमित सेवा आहे. गावातील पारंपरिक जगदंबा देवी उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, गरीबांचे विवाह समारंभ यासाठी आर्थिक मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य, बेरोजगार तरुणांना रोजगारासाठी संधी उपलब्ध करून देणे, अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. कृषी क्षेत्रातही ते सक्रिय असून पालघर जिल्हा कृषी आघाडीचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. शेतकरी मेळावे, मार्गदर्शन शिबिरे यांच्या आयोजनातून त्यांनी कृषी समृद्धीकडे टाकलेले पाऊल महत्त्वाचे ठरते. जात, धर्म यांच्या पलिकडे जाऊन संपूर्ण आदिवासी समाजासाठी त्यांनी हिरीरीने सामाजिक कार्य सुरू ठेवले आहे. कुस्ती आखाडे, क्रीडा स्पर्धा, क्रिकेट सामने यांच्यातून तरुणाईला एक सकारात्मक व्यासपीठ देण्याचा त्यांचा प्रयत्न सतत सुरू आहे. समस्यांपासून पळ न घेता त्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधणे हा त्यांचा स्वभाव. रात्री-अपरात्री कोणतीही मदत हवी असल्यास जानू माळी हे तत्काळ उपस्थित राहतात. हीच त्यांची जनसेवेची वृत्ती त्यांच्या लोकप्रियतेमागे कारणीभूत आहे. त्यांची कठोर मेहनत, संवेदनशीलता आणि समाजातील प्रत्येक घटकासाठी केलेली निस्वार्थ सेवा नव्या पिढीसाठी एक प्रेरणास्त्रोत ठरत आहे. त्यांच्या कार्याने मिळालेली लोकमान्यता हेच त्यांच्या यशस्वी जीवनप्रवासाचे खरे प्रमाणपत्र आहे.

# महेश नवमीच्या निमित्ताने बुधवार ४ जून रोजी शहरात भव्य शोभायात्रा

**वरोरा । प्रतिनिधी**

महेश नवमी उत्सवाच्या निमित्ताने माहेश्वरी समाजाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुधवार, ४ जून रोजी सायंकाळी ५ वाजता लक्ष्मीनारायण मंदिराच्या परिसरातून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोभायात्रेमध्ये समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. शोभायात्रेपूर्वी लक्ष्मीनारायण मंदिरात भगवान शंकराची आरती होईल, त्यानंतर शोभायात्रेला प्रारंभ होईल.

महेश नवमीच्या शुभ अवसरावर माहेश्वरी चंद्रपूर तालुका संघटन, माहेश्वरी युवक मंडळ आणि माहेश्वरी महिला मंडळ यांच्या वतीने विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये दाताळा येथील बिग बुल टर्फवर बॉक्स क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये महिलांनी आणि पुरुषांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



बालक आणि महिलांसाठी लिंबू शर्यत, बोरी शर्यत, संथ सायकलिंग अशा मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच कॅरम आणि बुद्धिबळ (शतरंज) स्पर्धांचाही यशस्वी आयोजन झाले. या सर्व उपक्रमांमुळे महेश नवमीचा उत्सव अधिक रंगतदार आणि आनंददायी ठरला. सर्व सहभागी आणि आयोजकांचे सहकार्य अत्यंत प्रशंसनीय राहिले. या वेळी विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष दामोदरजी सारडा, जिल्हाध्यक्ष शिवनारायणजी सारडा, तालुका अध्यक्ष उमेशजी चांडक, सेवा समितीचे उपाध्यक्ष डॉ. सुशील मुंधडा, दिनेश बजाज, सुरेशजी राठी, तहसील सचिव राजेशजी काकानी, महिला मंडळ अध्यक्षा अल्का चांडक, पायल सारडा, युवक संघटनेचे अध्यक्ष प्रवीण सारडा, ऋषिकांत जाखोटिया, युवक मंडळाचे माजी अध्यक्ष शक्तिजी धूत, श्रवण मंत्री सुधीरजी बजाज आणि समाजबांधव श्री राजकुमार जाजू यांची उपस्थिती होती. ४ जून रोजी होणाऱ्या शोभायात्रेत अधिकाधिक समाजबांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महेश नवमी उत्सवाचे प्रकल्प संचालक ललित कासट यांनी केले आहे.

# ज्येष्ठ विचारवंत आ.ह साळुंखे यांच्या चोखिया पुस्तकाचे प्रकाशन

**मंगळवेढा (वृत्तसंस्था)**–संत चोखिया आणि त्यांच्या कुटुंबातील संतांनी लिहिलेल्या अभंग भक्तीबरोबर वेदनेचा हुंकार आहे. जगाच्या पातळीवर एकाच कुटुंबातील एवढे संत असणारे एकमेव उदाहरण म्हणजे संत चोखोबारायांचा परिवार आहे. चोखोबांच्या कवितेत भक्ती आविष्कृत होते. त्याचबरोबर विद्रोहही आहे, असे प्रतिपादन डॉ. नवनाथ शिंदे यांनी केले. ते ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखेलिखित नवीन पुस्तक 'चोखिया : चोखियांचे अवघे कुटुंब संत' या पुस्तकाचा प्रकाशनप्रसंगी बोलत होते. मंगळवेढा आणि पंढरपूर येथील संत चोखामेळा समाधी ट्रस्टचे सेवकरी यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

या प्रकाशन सोहळ्यास डॉ. आ. ह. साळुंखे, ट्रस्टी जयराज शेंबडे, रवी सर्वगोड, कवी इंद्रजित घुले, लोकायत प्रकाशनचे राकेश साळुंखे, पुलकेशी साळुंखे, डॉ. प्रशांत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. संत चोखामेळा समाधी ट्रस्ट मंगळवेढा यांच्यावतीने चोखिया या पुस्तकाचे लेखन कार्य केल्याबद्दल आ. ह. साळुंखे यांचा तुळसी हार आणि सन्मानपत्र देऊन जयराज शेंबडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सन्मानपत्राचे वाचन डॉ. दत्ता सरगर यांनी केले. या कार्यक्रमास पार्थ पोळके, ॲड. खोखिया या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. शिंदे, लेखक आ. ह. साळुंखे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. विनायक सरवळे, राजेंद्र बनसोडे, ॲड. राहुल घुले आदी मान्यवर उपस्थित होते. अमित मेधावी यांनी सूत्रसंचालन केले. तर सदा पाटील यांनी आभार मानले. यावेळी अनेक जण उपस्थित होते.संत चोखोबांचे जागतिक स्तरावर संदर्भ नोंदवले आहेत : साळुंखे डॉ. आ. ह. साळुंखे म्हणाले, या पुस्तकात संत चोखामेळा यांचे जागतिक स्तरावरील संदर्भ नोंदवलेले आहेत. त्या नोंदींची मराठीत भाषांतरे घेतलेली आहेत. महाराष्ट्रात जिथे जिथे चोखियांच्या संदर्भात नोंदी सापडल्या, त्या पुस्तकात मांडलेल्या आहेत. विशेषत: या संत परिवाराने लिहिलेले अभंग आणि त्या अभंगातील जाण, अभ्यास किती खोलवर आहे, हे लक्षात येते.

# आदिवासी भागातील आशेचा किरण : सुदाम उंबरसाडा

**जव्हार । जितेंद्र मोरघा**

शहरातील सुखसोयी, उच्च शिक्षणानंतरची नोकरी आणि आरामदायी जीवनाचे स्वप्न आजच्या तरुण पिढीला आकर्षित करतं. पण काही मोजके तरुणच असे असतात, जे स्वतःचा लाभ बाजूला ठेवून समाजासाठी, गावासाठी स्वतःला झोकून देतात. अशाच ध्येयवेड्या तरुणाचं नाव म्हणजे सुदाम उंबरसाडा.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनकल्याण समिती, वनवासी कल्याण आश्रम अशा संस्थांतून सामाजिक कार्याची बीजं रुजलेली असलेले सुदाम, बोईसर आणि नाशिकमध्ये एम.एस.डब्ल्यू. शिक्षण घेत असताना चांगल्या पगाराच्या नोकरीत दाखल झाले. मात्र नोकरीच्या सुरक्षिततेऐवजी त्यांनी शहर सोडून गावाकडे हा विचार अंगीकारत, आपल्या मूळगावी दाभलोन (ता.जव्हार) येथे परतण्याचा निर्णय घेतला.

दाभलोन ग्रामपंचायतमध्ये एकूण ८-९ पाड्यांचा समावेश असून ती संपूर्णतः मूलभूत सुविधांपासून वंचित होती. रस्ते, वीज, पाणी, आरोग्य सुविधा, मोबाईल रेंज काहीही नव्हतं. अशा परिस्थितीत सुदाम उंबरसाडा यांनी तन-मन-धनाने कार्याला सुरुवात केली. शासकीय यंत्रणेची उदासीनता लक्षात घेत, त्यांनी तरुणांची टीम उभी करून ग्रामपंचायतीची निवडणूक लढवली आणि संपूर्ण पंचायत मोठ्या मताधिक्याने जिंकली.ग्रामपंचायतच्या माध्यमातून पक्के रस्ते, नदीवरून पाणीपुरवठा योजना, सिमेंट ब्लॉक रस्ते, मोबाईल रेंजसाठी प्रयत्न, घनकचरा व्यवस्थापन, सार्वजनिक स्वच्छता सुविधा, वीज, शौचालयांची निर्मिती असे अनेक प्रश्न मार्गी लावले गेले. गावात सुरू करण्यात आलेल्या ई-सेवा केंद्रामार्फत लाईट बिल भरणे, झेरॉक्स, बँक व्यवहार, शैक्षणिक सल्ला आदी सेवा



मोफत उपलब्ध झाल्या, त्यामुळे तालुक्यापर्यंत जाण्याची गरजच उरली नाही.

दिल्लीच्या उमा नारायण यांच्या सहकार्याने दाभलोन येथे अत्याधुनिक टेलिमेडिसिन सुविधा असलेले आरोग्य तपासणी केंद्र उभे करण्यात आले. यामध्ये ऑनलाईन डॉक्टर सल्ला व रुग्णवाहिका उपलब्ध आहे. नदीवर पूल उभारून पुरामुळे निधन पावलेल्या वडिलांना त्यांनी खरी श्रद्धांजली वाहिली.

महिलांसाठी मोफत शिवणक्लास, तरुणांसाठी कॉम्प्युटर क्लास, रोजगार मेळावे, व्यवसाय मार्गदर्शन शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप अशा अनेक उपक्रम आदिवासी अस्मिता प्रतिष्ठानतर्फे राबवले जात आहेत. दाभलोनच्या प्रवेशद्वारावर उभारलेली भगवान बिरसा मुंडा यांची भव्य प्रतिमा आदिवासी अस्मितेचं प्रतीक बनली आहे.

राजकीय चर्चांमध्ये त्यांचं नाव घेतलं जात असलं तरी, सुदाम उंबरसाडा यांची खरी ओळख त्यांचं तळमळीचं, लोकहिताचं आणि कृतीशील नेतृत्व आहे. दोन जून या त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रातून शुभेच्छांचा वर्षाव होतो आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून विविध विकास कामांची पाहणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाने वरिष्ठ अधिका-यांना फिल्डवर जाऊन विकास कामांच्या प्रगतीचा आढावा तसेच नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेण्याचे निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि.३) वरोरा तालुक्यातील विविध विकास कामांना भेट देऊन सदर कामांची पाहणी केली.

पाहणी दरम्यान जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी विकास कामांच्या प्रगतीचे टप्पे व अडचणी आदीबाबत अधिकारी व नागरिकांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे बांधण्यात येत असलेले महिला बचत गटाच्या वस्तू विक्री शॉपिंग मॉलला भेट दिली. रोजगार हमी योजनेतून वरोरा तालुक्यातील सालोरी येन्सा येथील प्रगतशील शेतकरी यांच्या रेशीम उत्पादन व मलबेरी प्लांटेशन केंद्र, कॅम्पा निधीतून वन विभागद्वारे टेमुर्डा येथे राबविण्यात येणारे चारा गवत विकास प्रकल्प, नगर परिषद वरोरा व अंबुजा फाउंडेशन यांच्याद्वारे करण्यात येत असलेले वरोरा शहरातील गांधी सागर तलाव



खोलीकरण कामाची पाहणी पाहणी केली.यावेळी जिल्हाधिका-यांसोबत उपविभागीय अधिकारी अतुल जटाळे, तहसीलदार योगेश कौटकर, नगर परिषद मुख्याधिकारी विशाखा शेळकी, कनिष्ठ अभियंता श्री. खणके, वन परिक्षेत्र अधिकारी श्री. शेंडे , मंडळ कृषी अधिकारी श्री. काळे व इतर अधिकारी उपस्थित होते.भद्रावती तालुक्याला सुध्दा भेट : जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी भद्रावती तालुक्यातील कार्यकारी सहकारी संस्था येथे भेट दिली. तसेच पळसगाव येथील पूर पूर्व परिस्थितीची पाहणी करून नागरिकांशी चर्चा केली. भद्रावती तालुक्यातील मौजा कुचना येथील जिल्हा परिषद शाळेची यावेळी त्यांनी पाहणी केली.

# भाजप जिल्हाध्यक्षपदी अनिल मोहिते यांची नियुक्ती केडगावकरांना न्याय मिळाला–साहेबराव विधाते

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भाजपच्या शहरजिल्हाध्यक्ष पदी अनिल मोहिते यांची निवड म्हणजे केडगावकरांच्या निष्ठावान कार्यकर्त्यांचा सन्मान असून गेल्या ३० वर्षापासून भारतीय जनता पार्टीच्या सामान्य कार्यकर्त्यांनी संघर्ष केला. वेळ प्रसंगी गुन्हे दाखल झाले. अनेकांवर अन्याय झाला. सत्तेच्या काळात केडगावला अध्यक्षपद मिळाल्याने आगामी काळात विकासाला गती मिळणार असल्याची भावना भाजपाचे केडगाव मंडल माजी अध्यक्ष साहेबराव विधाते यांनी व्यक्त केले.

भाजप शहर जिल्हाध्यक्षपदी अनिल मोहिते यांची नियुक्ती झाल्याबद्दल भाजपाचे केडगांव मंडल माजी अध्यक्ष साहेबराव विधाते यांनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी अभिजित विधाते उपस्थित होते. पुढे बोलताना साहेबराव विधाते म्हणाले की, मोहिते हे श्रीलक्ष्मी मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी (बुरुडगाव) तसेच लक्ष्मी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी (केडगाव) या आर्थिक संस्थांचे संस्थापक आहेत तसेच त्यांचा ढवळपुरी (ता. पारनेर) येथे कृषीनाथ ग्रीन एनर्जी हा खाजगी साखर कारखाना आहे व या कारखान्याचे ते उपाध्यक्ष आहेत. याशिवाय सिंदखेड राजा (बुलढाणा) तालुक्यातील दुसरबीड येथील जिजामाता



सहकारी साखर कारखान्याचे ते कार्यकारी संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. केडगाव उपनगरातील एस. एस. मोहिते विद्यालयाचे संस्थापक आणि वसुंधरा कृषी व ग्रामीण विकास संस्थेचे मुख्य प्रवर्तक आहेत. यशदा संस्थेचा जलनायक हा पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. त्यांच्या सामाजिक व राजकीय कारर्दिचा पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना अभिमान आहे. अनेक वर्षापासून मुळ प्रवाहपासून दुर गेलेल्या निष्ठावान कार्यकर्त्यांना या निवडीमुळे उत्साह संचारला आहे. आगामी महानगर पालिका निवडुकीत या निवडीमुळे निष्ठावान कार्यकर्त्यांना सन्मान मिळणार असल्याची भावना साहेबराव विधाते यांनी व्यक्त केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .